**धुळे जिल्हा शिरपूर तालुक्यातील मौजे लोंढरे येथील प्रस्तावित वाळू घाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी या ठिकाणी प्रस्तावीत असुन या विषयी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, शिरपूर स्थळावर दि. ०५/०३/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात आली. सदर झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

धुळे जिल्हा शिरपूर तालुक्यातील मौजे लोंढरे येथील प्रस्तावित वाळू घाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी या ठिकाणी प्रस्तावीत असुन या विषयी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, शिरपूर स्थळावर आज दि. ०५/०३/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता मा. श्री. संजय गायकवाड, अप्पर जिल्हादंडाधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

सौ. सौजन्या सु. पाटील, उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे यांनी दिनांक ५ मार्च २०२१ रोजी दुपारी २ वाजता. धुळे जिल्हा शिरपूर तालुक्यातील मौजे लोंढरे येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी अध्यक्ष तथा मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी साहेब, लोकसुनावणीचे सदस्य, श्री. प्रविण जोशी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक, व येथे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले.

धुळे जिल्हा शिरपूर तालुक्यातील मौजे लोंढरे येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १४/०१/२०२१ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या मान्यतेने दि. ०५/०३/२०२१, रोजी जाहीर लोकसुनावणी घेण्याचे आयोजित करण्यात आले होते. याबाबतची जाहीर सुचना दि. ०३/०२/२०२१ रोजी दै. लोकमत व द टाईम्स ऑफ इंडिया यामध्ये प्रकाशित करण्यात आली.

तसेच अधिसूचने प्रमाणे सदर प्रकल्पाबाबत प्रारूप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रति मराठी व इंग्रजीत शासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय धुळे ,जिल्हा उद्योग केंद्र, धुळे, जिल्हा परिषद कार्यालय धुळे, उपविभागीय कार्यालय शिरपूर, तहसिल कार्यालय, शिरपूर, ग्रामसेवक/ सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, लोंढरे, ता. शिरपूर जि. धुळे. उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक, या कार्यालयांमध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिनियम, २००६ च्या अधिसुचना व सुधारीत अधिसुचना दि. ०१/१२/२००९ मधील तरतुदी प्रमाणे सदरील जाहीर लोकसुनावणी साठी धुळे जिल्हा शिरपूर तालुक्यातील मौजे लोंढरे येथील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी प्रस्तावाबाबत मंजुरी करीता पर्यावरण विषयक लोक सुनावणी घेणे बंधनकारक आहे.

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रस्तावीत वाळू घाट प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रस्तावीत वाळू प्रकल्पाविषयी व या प्रकल्पामुळे होणारा परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे , प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व त्या अनुषंगाने माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबत परिसरातील नागरिक, सामाजिक सस्थांचे प्रतिनिधी यांनी सदरच्या वाळू घाटाबाबत आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) कळवाव्यात हि विनंती करण्यात आली. त्यानुसार उप-प्रादेशिक कार्यालय, धुळे येथे अद्यापपर्यंत सदर वाळू घाटाबाबत आक्षेप, सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) एकही सुचना प्राप्त झालेली नाही.

मी, माननीय अध्यक्ष महोदय यांचे पूर्वपरवानगीने प्रकल्प प्रवर्तकास पीपीटीचे सादरीकरण करण्यासाठी विनंती करते.

**मा. अध्यक्ष** :-सदर पर्यावरण विषयक जाहिरसुनावणी दरम्यान उपस्थितांनी कुणाला आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप असतील तर ते मांडावे.

**श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :- मौजे लोंढरे येथील वाळू घाटाची जाहीर लोकसुनावणी प्रस्तावीत थोडक्यात मांडले.

**सौ. सौजन्या सु. पाटील (उप-प्रादेशिक अधिकारी)** :- कुणाला आपले विचार/ टिका टिपणी, आक्षेप असतील तर ते मांडावे.

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव व उपस्थित केलेले विचार/ टिका टिपणी, आक्षेप. | प्रकल्प प्रस्तावकाकडून करण्यात आलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | **श्री. प्रदिप गोकूळ पाटील** –<br>आपण वाळू वाहतूकीसाठी कोणत्या रस्त्याचा वापर करणार. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-– यांनी सांगितले की गावा बाहेरील रस्त्याचा वापर केला जाणार आहे. |
| २ | **श्री. निलेश रविंद्र वाघ** –<br>यांनी विचारले की, मागील ५ वर्षा पासून पहात आहे. लोंढरे येथे वाळू तुम्हाला भरपूर प्रमाणात मिळणार नाही. या वाळू उत्खननामुळे पाणी पातळी खाली जात आहे. २ वर्षा पासून गावातील लोकांना पिण्यास पाणी नव्हते. यांचा प्रश्न आधी मार्गी लावावा. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-<br>१ मीटर पर्यंत उत्खननास परवानगी मिळाली असल्यामुळे कुठलाही परिणाम होणार नाही.<br>भुजल सर्वेक्षण करून घेण्यात येईल व भुजलावर परिणाम होणार नाही. |
| ३ | **श्री. नितीन कोळी** –<br>शेतक-यांचे बोरवेल हे १५० ते २५० फुट पर्यत गेले आहेत. मागच्या वेळेस ठेके दिले होते पण ठेके दारांनी दिलेली आश्वासने पुर्ण झाली नाहीत. गावातून वाळू वाहतूक होते तेव्हा गावातील संपूर्ण रस्ते हे खराब होतील. माझा या वाळू ठेकयाला पुर्ण पणे विरोध आहे व मी उपोषनाला बसणार. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-<br>ठेकेदाराकडून वाळू वाहतूक करण्यासाठी गावाबाहेरील रस्ता तयार करण्याबाबत पुर्व कल्पना देण्यात येईल. |
| ४ | **श्री. प्रदीप पाटील** –<br>आम्ही आमच्या गावातील रस्ते हे वाळू वाहतूक करणा-या वाहनाना वापरास मनाई करू. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-<br>ठेकेदाराकडून वाळू वाहतूक करण्यासाठी गावाबाहेरील रस्ता तयार करण्याबाबत पुर्व कल्पना देण्यात येईल. |
| ५ | **श्री. मा. संजय गायकवाड, (अध्यक्ष)** –<br>शासनाने ठरवून दिलेल्या धोरणा नुसारच वाळू लीलाव होईल. | -- |
| ६ | **श्री. अनिल माळी (शिरपूर)** –<br>या गावाला वाळू मिळावी. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-<br>वाळू धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ७ | **श्री. दिपक दत्तु गिरासे** –<br>आपण वाळू संदर्भात जे उत्खनन करणार आहात त्याचे नियंत्रण कोण करणार आहे. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी)** :-<br>शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार त्यांच्यावर पाळत ठेवण्यासाठी ग्रामदक्षता समिती, तहसिलदार, प्रांत अधिकारी, जिल्हा प्रशासन नियंत्रण करू शकतात. |

| | | |
|---|---|---|
| ८ | **श्री. मा. संजय गायकवाड, (अध्यक्ष) –**<br>शासन नियमाणे विविध दक्षता समिती गठीत होईल, शासकीय वाळू धोरणा नुसार प्रशासन आवश्यक ती कार्यवाही करेल. जन सुनावणी हा पहिला टप्पा आहे हा वाळू लिलाव नाही. ईतिवृत्ता मध्ये याची नोंद घेण्यात येईल.<br>सदर्भास अनुसरून प्रश्न विचारावेत असे सांगितले. | -- |
| ९ | **श्री. रोहीत शेटे –**<br>अम्हाला हमी भाव १०० टक्के मिळावा ? व आम्हाला ठेके मिळावेत. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी) :-**<br>आम्ही ईतिवृत्तामध्ये यांची नोंद घेवू. |
| १० | **श्री. राधेशाम रतिलाल चौधरी –**<br>यांनी सांगितले की, महाराष्ट्र गुजरात तस्करी चालू आहे ते बंद झाले तर अ‍ॅक्सीडंट होणार नाहीत. | -- |
| ११ | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी) :-**<br>कुणाला अजुन काही प्रश्न असतील तर आपण विचारू शकतात. | -- |
| १२ | **श्री. मोहन बोरसे (दिव्य मराठी) –**<br>यांनी सांगितले की, ठेकेदार जे लोकांना त्रास देतात त्याची दखल कोणीच घेत नाही. तसचे उप्परपिंड च्या वाळू उपसामुळे खडडे पडले व तिथे मुलगा मेला तरी जो ठेका दिला जातो त्यात कुठलेही नियम पाळत नाहीत. आणि पोकलॅड ने ५० फुट खडडे खोदले. | **श्री. मा. संजय गायकवाड, (अध्यक्ष) –**<br>उप्परपिंड येथील घटने प्रकरणी चौकशी झाली आहे. त्या संदर्भात या पुर्वी कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. तसेच शासनाने त्यासाठी ग्राम दक्षता समिती निवडली आहे. पहिला अधिकार हा ग्रामस्थांचा आहे.<br>आपणच सांगत आहात की गुजरात मधुन वाळू येत आहे. त्यापेक्षा महाराष्ट्रातही लिलाव होऊ दयावा. त्यात अटी शर्ती नियम शासनाने लावून दिले आहेत. त्यानुसार लिलाव करावा लागणार आहे. लिलावाव्दारे वाळू उपलब्ध झाली तर चो-या थांबतील. |
| १३ | **श्री. किशोर गिरासे –**<br>त्यांनी सांगितले की, त्या संबधीत नियम पाळण्यासाठी ठेकेदाराकडून १०० च्या स्टॅम्प पेपर वर हमी पत्र घ्यावे. | **श्री. घोडके (जिल्हा खनिकर्म अधिकारी) :-**<br>शासकीय वाळू धोरणानुसार ठेकेदाराने शासकीय अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. |

जनसुनावणीच्या संयोजक **सौ. सौजन्या सु. पाटील** यांनी उपस्थितांपैकी कुणास मत मांडण्याचे आवाहन केले. तथापी कुणीही आपले मत मांडण्याकरीता पुढे आले नाही.

**अप्पर जिल्हा दंडाधिकारी श्री. संजय गायकवाड** यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये केला जाईल अशी माहिती दिली. प्रस्तावीत वाळू घाटाच्या जनसुनावणीच्या वेळी अधिका-यांनी दिलेल्या सर्व आश्वासनांची पुर्तता करण्याबाबत व हवा, पाणी, व ध्वनी प्रदुषण नियंत्रण बाबत आवश्यक ती यंत्रणा बसविण्याबाबत सुचित केले. जिल्हा प्रशासनातर्फेसुध्दा प्रकल्पाच्या कामकाजावर देखरेख ठेवली जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणीच्या संयोजक सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे यांनी उपस्थित नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांची यथोचित नोंद घेण्यात आली असून त्यांचा समावेश जनसुनावणीच्या ईतिवृत्तामध्ये केला जाईल अशी माहिती दिली. मा. अध्यक्षांच्या परवानगीने त्यांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| **सौ. सौजन्या सु. पाटील** | **श्री. प्र. म. जोशी** | **श्री. संजय गायकवाड** |
|---|---|---|
| संयोजक, जनसुनावणी समिती | सदस्य, जनसुनाचवणी समिती | अध्यक्ष, जनसुनावणी समिती |
| तथा उप-प्रादेशिक अधिकारी, | तथा प्रादेशिक अधिकारी, | तथा |
| म.प्र.नि. मंडळ, धुळे | म.प्र. नि.मंडळ, नाशिक | अप्पर जिल्हा दंडाधिकारी, धुळे |